रे.दि.मु.नं.३३/२०२२
नि.क्र.८४

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ मोहन महादेव डाफळे , वय ६५ वर्ष, धंदा - शेती, रा. सोनवडे, मधली वाडी ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांचा सरतपास वादींतर्फे वकील श्रीमती बी.एस.मुरूडकर यांचेकडुन शपथेवर सुरू -**

१. मी वादीला ओळखतो. मी वादीच्या मुलीला ओळखतो. मी प्रतिवादींना ओळखतो. मी सोनवडे येथे जन्मापासून वास्तव्यास आहे. वादी व प्रतिवादीचे सोनवडे येथे शेती व घरे आहेत. घर नंबर ६ब अमित रजनीकांत खातु यांचे आहे. सध्या या घरात वादी राहतात. त्या घराच्या पाठीमागील भागात पडवी मध्ये राहतात. माझ्या माहितीनुसार २००४ पासून वादी तेथे राहतात. वादीसोबत तिची मुलगी देखील तिथे राहते. वादी व तिच्या मुलीला मी गेली २५ ते ३० वर्षापासून ओळखतो. वादीने हा दावा त्याच्या हिश्यासाठी केल्याचे मला माहिती आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ व ४ तर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांच्याकडून शपथेवर सुरू -**

२. मी डाफळे मधली वाडी येथे राहतो. मधली वाडी ते सोनारवाडी ५ मिनीटाचे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की सोनारवाडी येथे देखील राहती घरे आहेत. १९६२ चा माझा जन्म आहे. मी पूर्वी शेती करायचो. मला माझ्या घराचा घर नंबर सांगता येणार नाही. माझे घर स. नं. १९१६ येथे आहे. मी सरतपासात सांगितलेल्या घराचा कर आकारणी उतारा पाहिला नाही. घर नंबर ६ब ची लांबी रूंदी ४३ x ३० अशी आहे. मला पडवीची लांबी रूंदी सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की वादीचे लग्नानंतरचे गाव सोनावडे नाही. हे म्हणणे खरे आहे की वादीच्या पतीच्या मृत्यू पश्चात अमित आणि अभिजित यांच्या परवानगीने त्या त्या घरात राहत

आहेत. हे म्हणणे खरे आहे की वादीशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या सांगण्यानुसार आज मी न्यायालयात साक्ष देण्यास आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की कोर्टाचे समन्स प्राप्त झाल्यानंतर वादीच्या मुलीची आणि माझी साक्षीसंदर्भात चर्चा झाली. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही**

**प्रतिवादी क्र. २,३,५ ते ८ यांच्याविरूध्द एकतर्फा आदेश झाल्याने उलटतपास नाही**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/-**
**(श्रुती ह. पाटील )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

**दि. १८/०४/२०२४**